अत्यंत महत्त्वाचे व तातडीचे

Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF-28th Rank

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

दि.२१ फेब्रुवारी, २०१७ रोजी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका २०१७ घेण्यात येणार आहेत, हे आपणास विदित आहेच. सदर निवडणुकांच्या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी दि.०५/०२/२०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर जिल्हा, मा.कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ व अन्य अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार मतदानाविषयी जागृती करण्यासाठी मा.कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ हे सांगली व सातारा जिल्हयातील महाविद्यालयांसाठी उद्या दि.१७/०२/२०१७ रोजी सकाळी ०९.०० वाजल्यापासून मार्गदर्शन करणार असून कोल्हापूर जिल्हयातील महाविद्यालयांसाठी मा.जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर जिल्हा, हे सकाळी ११.१५ वाजल्यापासून वेबकास्टिंगद्वारे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाच्या प्रक्षेपणासाठी महाविद्यालयांनी त्यांच्याकडील सभागृहामध्ये इंटरनेट सुविधेसह एक अद्ययावत संगणक एलसीडी/डीएलपी सुविधेसह उपलब्ध करून घ्यावा. यानुसार सांगली व सातारा जिल्हयातील महाविद्यालयांनी दि.१७/०२/२०१७ रोजी सकाळी ०९.०० वाजता तर कोल्हापूर जिल्हयातील महाविद्यालयांनी दि.१७/०२/२०१७ रोजी सकाळी ११.१५ वाजता पुढील वेबलिंकवर क्लिक करून सदर कार्यक्रमाचे एलसीडी स्क्रीनवर प्रक्षेपण करावे. : www.cloud-india.com/live

या कार्यक्रमामध्ये आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी, प्रशासकीय सेवक तसेच समाजातील सर्व घटकांना समाविष्ट करून घ्यावे. तसेच सदर दिवशी अनुपस्थित असणा-या विद्यार्थ्यांसाठी दि.१८/०२/२०१७ रोजी वर नमुद केलेल्या वेळेत सदर कार्यक्रमाचे पुन:प्रक्षेपण करावे आणि दोन्ही दिवसांच्या कार्यक्रमांचा फोटोसहीत अहवाल zpelection2017@unishivaji.ac.in तसेच affiliation.t2@unishivaji.ac.in या ई-मेलआयडीवर सत्वर पाठवावा. विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांनी मतदान जागृती अभियानाविषयीचे सदर प्रक्षेपण आयोजित करून सर्व मतदारांना प्रोत्साहित करावे.

कळावे,

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

संदर्भ क्र.संलग्नता/टी-२/२०८
दि.१६/०२/२०१७

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्न पारंपारिक महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

टिप - उपरोक्त परिपत्रक विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर BCUD-Affiliation T-2 Circular या लिंकवर उपलब्ध आहे. तसेच याअनुषंगाने संदर्भ क्र.संलग्नता/टी-२/२०७, दि.१६ फेब्रुवारी, २०१७ अन्वये पाठविलेले परिपत्रक रद्द समजावे.